# SAPTASHRUNGI BAHUUDDESHIYA MAHILA SANSTHA DHULE

Reg. No. MH 7637/F 3764/2006 Dhule

12AA No.-(PRO)/12AA/2012 2013/18/47
80GNo.-(CIT-I) 80G/2012-2013/4229/67/83

NGO DARPAN Unique ID-MH/2012/0052945

**Email: minabhosale@gmail.com**

**Head-Office: -** 51, Saptshrungi Nagar, B/H Akashwani Kendra, Near Om Nagar, Walwadi Shiwar, Vidya Nagari Deopur-Dhule-05.

**PH No.**02562-275067. **Mob:** 8857041049 / 9657825963


**O/W.No. /SBMS /2024** **Date: / /2024**

# ANNUAL REPORT 2023-24

## 01, April 2023 to 31 March 2024

सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे २००६ पासून विविध प्रकल्पांद्वारे सामाजिक कार्य करत आहे. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई सहाय्यित लिंक वर्कर प्रकल्पाच्या माध्यमातून धुळे जिल्ह्यातील १०० गावांमधील अति जोखीम गटातील लोकांची HIV तपासणी करून HIV बाधित रुग्णाला ART ची सेवा व शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे. तसेच लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्पाच्या माध्यमातून शहरी भागातील FSW व MSM या समुदायातील लोकांची HIV बाधित रुग्णाला ART ची सेवा व शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे. महिला व बालविकास मंत्रालय नवी दिल्ली सहाय्यित चाइल्डलाईन १०९८ हेल्पलाईन सेवा दिवसाचे २४ तास वर्षातील ३६५ दिवस काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी विनामूल्य सेवा आहे हि ० ते १८ वयोगटातील बालकांसाठी कार्यरत आहे. तसेच शालेय विद्यार्थिनींना ज्युडो-कराटे, ग्रामीण भागात फॅशन डिझाईनिंगचे कोर्स, तसेच आदर्शगाव योजना - पाणलोट विकास, शेतकरी, पर्यावरण, आरोग्य व रोजगार विषयक विविध योजनांच्या माध्यमातून गरजूंना मदत करते.

# लिंक वर्कर प्रकल्प

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई सहाय्यित सप्तशृंगी बहुउद्देशिय महिला संस्था धुळे, मार्फत १ जानेवारी २०१४ पासून लिंक वर्कर प्रकल्प कार्यरत आहे. लिंक वर्कर प्रकल्पांतर्गत धुळे जिल्ह्यातील 100 गावांमध्ये एचआयव्ही जनजागृतीचे काम केले जाते. त्यामध्ये अति जोखीम गटातील लोकांमध्ये HIV चे प्रमाणाला प्रतिबंध व्हावा म्हणून लिंक वर्करच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये एकात्मिक समुपदेशन आणि तपासणी केंद्राचे (ICTC) समुपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या मार्फत तपासणी करण्यात येते. गावामधील अति जोखीम गटातील FSW, MSM, Trucker, Migrant, Other VP, TB Petient, ANC Mother अशा लोकांची तपासणी करण्यात येते. गावात झालेल्या HIV तपासणी कॅम्प अंतर्गत जर कोणी HIV पॉजिटीव्ह निघाले तर त्या व्यक्तीला लिंक वर्कर च्या माध्यमातून जिल्ह्यातील ART केंद्राला लिंक करण्यात येते. त्याच पद्धतीने अशा HIV पॉजिटीव्ह व्यक्तीला लिंक वर्करच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्व म्हणून त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देखील देण्यात आला. जसे - घरकुल आवास योजना, संजय गांधी निराधार योजना, आधार कार्ड, ई-श्रम कार्ड, आभा कार्ड, आयुष्यमान कार्ड, बस पास, रमाई आवास योजना, बँक पासबुक अशा विविध योजनाचा लाभ देण्यात आला. या प्रकल्पामुळे प्रकल्पातील गावांमधील एचआयव्हीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे लोकांमध्ये आढळून आले. तसेच ग्रामीण भागातील अति जोखीम गटातील लोकांना आरोग्य शिबिरामध्ये डॉक्टरकडून मोफत आरोग्य तपासणी करून मोफत गोळया औषधी दिल्या जातात.

# Dhule District

## Statistics

| | | HIV Testing typology wise | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Village | No. of HIV PositiveCases (new Idetification in year) | FSW | MSM | MIGRANT | TRUCKER | Other VP | ANC | TB Cases |
| 100 | 27 | 299 | 16 | 3340 | 430 | 4353 | 333 | 25 |

| ALIVE Cases Cumulative | TB | |
|---|---|---|
| PLHIV | TB Cases | TB Treatment Completed |
| 27 | 25 | 22 |

## Social Benefit

| Sr.No. | Benifits | Total |
|---|---|---|
| 1 | E-Shram Card | 11 |
| 2 | Aadhar Card | 08 |
| 3 | Bus Pass | 13 |
| 4 | ART Certificate | 06 |
| 5 | Sanjay Gandhi Niradhar Yojana | 07 |
| 6 | Ramai Gharkul Awas Yojana | 02 |
| 7 | Shabari Gharkul Awas Yojana | 03 |
| 8 | Income Certificate | 05 |
| 9 | Bank Account Open | 14 |
| 10 | Ayushyaman Card | 174 |
| 11 | Abha Card | 145 |
| | **Total** | **243** |

## Health Camp

| Total Health Camp | Benificary | Positive |
|---|---|---|
| 16 | 971 | 0 |

## लिंक वर्कर प्रकल्पांतर्गत गावामध्ये १६ आरोग्य शिबीर घेऊन एकूण ९७१ लोकांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार करण्यात आला.




शिरपूर तालुक्यातील तोंदे या गावाला आरोग्य शिबीर घेण्यात आले त्यामध्ये ४८ लोकांची आरोग्य तपासणी करून औषधी वाटप करण्यात आले.

<u>१२ ऑगस्ट २०२३ आंतरराष्ट्रीय युवा दिन संपन्न</u>

महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था, मुंबई सहाय्यित सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे मार्फत राबविण्यात येणाऱ्या लिंक वर्कर प्रकल्प व जिल्हा एड्स नियंत्रण धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात धुळे शहरातील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले त्यात बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थ्यींनी सहभाग नोंदविला. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमात जिल्हाधिकारी अभिनव गोयल साहेब, महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अतिरिक्त संचालक श्री.प्रसाद भंडारी साहेब, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता साहेब तसेच जिल्हा शल्यचिकित्सक श्री.सांगळे साहेब व जिल्हा पर्यवेक्षक श्री.विलास पाटील, सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले व संस्थेचे सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

(आंतरराष्ट्रीय युवा दिन दि. १२ ऑगस्ट २०२३ ते दि.२६ ऑगस्ट २०२३ पर्यंत साजरा करण्यात आला.)








**महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अतिरिक्त संचालक श्री.प्रसाद भंडारी, जिल्हा शल्यचिकित्सक श्री. सांगळे यांचे हस्ते विजेत्यांच्या सत्कार प्रमाणपत्र व मेडल देऊन करण्यात आले. तसेच सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले व संस्थेचे सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते**

# आंतरराष्ट्रीय युवा दिन निमित्त तोंदे येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न

**ठिकाण :- तोंदे ता. शिरपूर जि. धुळे** **दि.१२/०८/२०२३**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था ,मुंबई सहाय्यीत सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थे मार्फत तोंदे ता.शिरपूर जि. धुळे याठिकाणी जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला व HIV तपासणी करण्यात आली. सदर कार्यक्रमामध्ये थाळनेर ICTC चे समुपदेशक श्री. अमोल पाटील, सुपरवायझर झेलर पावरा, लिंक वर्कर लोटन करंकाळ यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले व कार्यकम घेतले व कार्यक्रम संपन्न झाला.







**थाळनेर ICTC चे समुपदेशक श्री. अमोल पाटील HRG लोकांना HIV एड्सविषयी मार्गदर्शन करतांना.**

# आंतरराष्ट्रीय युवा दिन निमित्त दहिवेल येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न

**ठिकाण :- दहिवेल ता.साक्री जि. धुळे** **दि.१२/०८/२०२३**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था ,मुंबई सहाय्यीत सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थे मार्फत उत्तमराव पाटील कला आणि विज्ञान महाविद्यालय दहिवेल ता.साक्री जि. धुळे याठिकाणी जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमामध्ये पिंपळनेर ICTCचे समुपदेशक श्री.आरिफ शहा, महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एस.ए.पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच लिंक वर्कर सुनिता चौरे, काशिनाथ चौरे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले व कार्यक्रम संपन्न झाला.



**महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एस.ए.पाटील विद्यार्थ्यांना HIV एड्सविषयी मार्गदर्शन करतांना.**



# ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिन कार्यक्रम संपन्न.

ठिकाण:- जुने सिविल हॉस्पिटल, धुळे दि.०१/१२/२०२३

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई संस्थेतर्फे ०१ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त जुने सिविल हॉस्पिटल, धुळे येथे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग व जिल्हा रुग्णालय तसेच सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे यांच्या संयुक्त विद्यमानाने कार्यक्रम पार पडला.

सदर कार्यक्रमात मा.जिल्हाधिकारी श्री.अभिनव गोयल, मा.जिल्हा पोलीस अधिक्षक श्री.श्रीकांत धिवरे, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त मा.करुणा डहाळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दत्ता देगावकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महेश भडांगे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक मुकुंद भट, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ.योगेश पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती शीतल पाटील, सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले तसेच संस्थेचे कर्मचारी व विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी, व इतर अशासकीय संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

सर्व प्रथम कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती शीतल पाटील यांनी केले. कार्यक्रमात मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर मान्यवरांनी दीप प्रज्वलन केले. नागरिकांमध्ये एड्स आजाराबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी प्रत्येक युवक व युवतींनी स्वयंस्फूर्तपणे पुढाकार घेऊन ब्रांड ॲम्बेसेडर म्हणून समाजात जनजागृती करावी, असे आवाहन मा.जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले. तसेच एड्स बद्दल समाजामध्ये पूर्वी खूप गैरसमज होते ते दूर करावयाचे काम शासन स्वयंसेवी संस्था आणि समाज हे तिन्ही मिळून करीत असुन या जनजागृतीमुळे समाजामधील अनेक गैरसमज दूर झाले आहे.त्यामुळे एड्सचे सामान्य रुग्ण ही समाजात सामान्यपणे जगू शकत आहे. आपल्या जिल्ह्यात जनजागृतीमुळे एड्सच्या रुग्णात घट झाली आहे. एड्स बाधित रुग्णास जिल्हा प्रशासनामार्फत विविध प्रकारची मदत व विनामूल्य उपचार शासनामार्फत केले जातात.

कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मान्यवर तसेच विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, अशासकीय संस्था कर्मचारी यांनी HIV एड्स संबंधी शपथ घेतली. त्यानंतर सिविल हॉस्पिटल येथून आयोजित प्रभात फेरीला मा.जिल्हाधिकारी यांनी हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. व प्रभात फेरीमध्ये सप्तशृंगी बहूउद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले तसेच संस्थेचे कर्मचारी, विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी व अशासकीय संस्थेचे कर्मचारी सहभागी झाले व एड्स संबंधी जनजागृतीसाठी स्लोगन, घोषणा देण्यात आल्या.

धुळे शहरातून प्रभात फेरी जुने सिविल हॉस्पिटल ला आली आणि त्याठिकाणी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना पिण्यासाठी पाणी, बिस्कीट वाटप केले. तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती शीतल पाटील यांनी शासकीय कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी, अशासकीय संस्था व कर्मचारी यांचे आभार मांडून कार्याक्रमाची सांगता केली.

१ डिसेंबर जागतिक एड्स दिवस निमित्त धुळे सिविल हॉस्पिटल येथे मा.जिल्हाधिकारी श्री.अभिनव गोयल, मा.जिल्हा पोलीस अधिक्षक श्री.श्रीकांत धिवरे, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त मा.करुणा डहाळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दत्ता देगावकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महेश भडांगे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक मुकुंद भट, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ.योगेश पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती शीतल पाटील, सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले तसेच संस्थेचे कर्मचारी व विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी, व इतर अशासकीय संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.




कार्यक्रम प्रसंगी धुळे जिल्ह्याचे मा.जिल्हाधिकारी श्री.अभिनव गोयल दीप प्रज्वलन करतांना.




सिविल हॉस्पिटल येथून आयोजित प्रभात फेरीला मा.जिल्हाधिकारी श्री.अभिनव गोयल यांनी हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करतांना.

# ०१ डिसेंबर ते १६ डिसेंबर जागतिक एड्स दिन व पंधरवडा निमित्त झालेले कार्यक्रम

| अ. क्र. | दिनांक | ठिकाण | ICTCचे नाव | उपस्थिती | HIV तपासणी | पॉझिटीव्ह | ART लिंक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०१/१२/२०२३ | जुने सिव्हील हॉस्पिटल, धुळे | - | ७५० | - | - | - |
| २ | ०१/१२/२०२३ | एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालय, शिंदखेडा | शिंदखेडा | ११० | - | - | - |
| ३ | ०१/१२/२०२३ | आर.सी.पटेल महाविद्यालय शिरपूर | शिरपूर | १४० | - | - | - |
| ४ | ०१/१२/२०२३ | ग्रामीण रुग्णालय पिंपळनेर | पिंपळनेर | ६५ | - | - | - |
| ५ | ०१/१२/२०२३ | फार्मसी महाविद्यालय, बोराडी | थाळनेर | ८० | - | - | - |
| ६ | ०२/१२/२०२३ | चौगाव ता.शिंदखेडा | - | ४५ | - | - | - |
| ७ | ०५/१२/२०२३ | सोनगीर टोलनाका | सोनगीर | ५० | ४० | - | - |
| ८ | ०७/१२/२०२३ | सोनगीर फाटा | सोनगीर | ४० | ३३ | - | - |
| ९ | ०७/१२/२०२३ | करवंद | शिरपूर | ४५ | २६ | - | - |
| १० | ०७/१२/२०२३ | दहिवद ता.शिरपूर | थाळनेर | १०० | ५६ | - | - |
| ११ | ०९/१२/२०२३ | कै.आ.मा.पाटील महाविद्यालय पिंपळनेर | पिंपळनेर | १२० | - | - | - |
| १२ | ११/१२/२०२३ | इच्छापूर टोलनाका ता.साक्री | साक्री | ४० | ३५ | - | - |
| १३ | १२/१२/२०२३ | दहिवेल | पिंपळनेर | ५० | ४८ | - | - |
| १४ | १३/१२/२०२३ | वागोदे | सोनगीर | ३० | १८ | १ | १ |
| १५ | १३/१२/२०२३ | श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय म्हसदी ता.साक्री | साक्री | १२० | - | - | - |
| १६ | १५/१२/२०२३ | होळ | शिंदखेडा | ६० | ५४ | - | - |
| १७ | १६/१२/२०२३ | कै.म.दि.सिसोदे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नरडाणा | शिंदखेडा | १४० | - | - | - |

# ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न.

ठिकाण:- एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालय, शिंदखेडा दि.०१/१२/२०२३



शिंदखेडा ICTC चे प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री.अतुल ठाकरे महाविद्यालयाच्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना शपथ देतांना.




एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालय, शिंदखेडा प्राचार्य श्री.पाटील सर प्रभात फेरीला हिरवी झेंडी दाखवतांना.

# ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न.

ठिकाण:- बोराडी ता.शिरपूर जि.धुळे  दि.०१/१२/२०२३



थाळनेर ICTC चे समुपदेशक श्री.अमोल पाटील फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनींना HIV एड्स विषयी मार्गदर्शन करतांना.




फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रभात फेरीमध्ये सहभाग घेतांना.

# ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न.

ठिकाण:- सोनगीर टोलनाका ता.जि.धुळे                                                   दि.०५/१२/२०२३



सोनगीर टोलनाक्याच्या कर्मचार्यांना डॉ.किरणकुमार निकवडे, ICTC सोनगीर प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री. कैलास वाडीले मार्गदर्शन करतांना.




सोनगीर टोलनाक्याच्या कर्मचार्यांना HIV एड्सचे माहिती पत्रक देतांना लिंक वर्कर निलेश बैसाणे.

# ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न.

ठिकाण:- इच्छापूर ता.साक्री जि.धुळे दि.११/१२/२०२३



इच्छापूर टोलनाका येथे साक्री ICTC चे समुपदेशक श्री.योगेश नांद्रे हॉटेल व ढाबा मालक तसेच कामगारांना HIV एड्सविषयी मार्गदर्शन करतांना.




इच्छापूर टोलनाका येथे साक्री ICTC चे समुपदेशक श्री.योगेश नांद्रे, सुपरवायझर, लिंक वर्कर ट्रकला १०९७ चे स्टीकर लावतांना.



# लक्षगट हस्तक्षेप प्रकल्प

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबईने सहाय्यित  सप्तश्रुंगी बहुउद्देशीय महिला संस्थेला ०१ एप्रिल २०१७ पासून आजपर्यंत लक्ष्यगट हस्तक्षेप (T.I.C.C.) प्रकल्प राबवित आहे. त्यात प्रामुख्याने धुळे जिल्ह्यातील शहरी भागातील देहविक्री करणाऱ्या महिला व MSM त्यांचे जोडीदार, PLHIV व त्यांचे जोडीदार, मुले,यांच्या ICTC अंतर्गत HIV तपासणी करणे तसेच संस्थेमार्फत विविध कॅम्प आयोजीत करून HRG ची आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार केला जातो. त्या कॅम्प मध्ये निघालेल्या पॉझ़िटीव पेशंटला ART ला लिंक करणे, तसेच क्लिनिकल सेवा पुरविणे, गुप्तरोग निदान व उपचार सुद्धा केले जातात.

तसेच संस्थेमार्फत CBS (Community Base Screening) HIV तपासणी करून त्यात पॉझ़िटीव पेशंट निघाला तर त्याला ICTC ला रेफर करून त्याला ART ला लिंक केले जाते. व औषधोपचार सुरु केला जातो.

संस्थेमार्फत HRG यांना Social Benefit Scheme चा लाभ मिळवून दिला जातो. त्यात रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड,आभा कार्ड, ई श्रम कार्ड, बँक अकाऊंट, बस पास, Pan कार्ड, संजय गांधी निराधार योजना, बालसंगोपन योजना, घरकुल योजना, उत्पन्न दाखला इ.

संस्था कर्मचार्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करते, कायदेविषयक कार्यशाळा HRG साठी आयोजित करते.विविध असे सामाजिक उपक्रम राबविले जातात.

## ICTC Testing

| | FSW | MSM | FSW Partener | MSM Partener | Total |
|---|---|---|---|---|---|
| **ICTC Testing** | 645 | 725 | 218 | 169 | 1757 |
| **Positive** | 5 | 2 | 0 | 0 | 7 |

## CBS Testing

| | FSW | MSM | Positive |
|---|---|---|---|
| **CBS Testing** | 824 | 298 | 0 |
| **Total** | 824 | 298 | 0 |

## STI ( Check up)

| Checkup **Center** | FSW | MSM | Total |
|---|---|---|---|
| STI Checkup | 4725 | 2348 | 7073 |
| **Treated** | 19 | 5 | 24 |

## Social Benefit

| Sr.No. | Benifits | Total |
|---|---|---|
| **1** | Ration Card | 04 |
| **2** | Income Certificate | 02 |
| **3** | E-Shram Card | 02 |
| **4** | Pan Card | 04 |
| **5** | Aadhar Update | 20 |
| **6** | Bus Pass | 01 |
| **7** | Balsangopan Yojana | 01 |
| **8** | Bank Account | 08 |
| **9** | ABHA CARD | 05 |
| **10** | Sukanya Yojana | 02 |
| **11** | Ayushyaman Card | 07 |
| **12** | Voter Card | 02 |
| **13** | Sanjay Gandi Niradhar Yojana | 02 |
| **14** | Birth Certificate | 05 |
| **15** | Bonafied Certificate | 01 |
| | **Total** | **66** |

## सन २०२३-२०२४ आरोग्य शिबीर

| Total Health Camp | Benificary | Positive |
|---|---|---|
| 7 | 410 | 0 |

# वडजाई रोड धुळे आरोग्य शिबीर व HIV तपासणी कॅम्प






# आंतरराष्ट्रीय युवा दिन निमित्त घेण्यात आलेले कार्यक्रम

**<u>आंतरराष्ट्रीय युवा दिन निमित्त प्रतिमा पूजन आणि शपथ घेतांना</u>**

दि.१२/०८/२०२३रोजी सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेमध्ये स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमा पुजन करून लक्ष गट हस्तक्षेप प्रकल्प , चाईल्ड लाईन व लिंक वर्कर प्रकल्पाचे कर्मचारी यांनी शपथ घेतली.






# आंतरराष्ट्रीय युवा दिन निमित्त मोहाडी येथे रांगोळी स्पर्धा संपन्न

दि.१७/०८/२०२३रोजी सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थे मार्फत दंडेवाले बाबा नगर, मोहाडी येथे महिलां करिता रांगोळी स्पर्धा , आरोग्य तपासणी व HIV तपासणी करण्यात आली. तसेच आंतरराष्ट्रीय युवा दिन निमित्त शपथ घेण्यात आली.श्री. हिरालाल भोसले, डॉ. हेमराज पाटील, सौ. सिमा बाविस्कर, श्री. प्रविण पालोदकर व TI प्रकल्पाचे कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले व कार्यक्रम संपन्न झाला.






# शिंदखेडा येथे युवा दिना निमित्त ब्राथल येथे रांगोळी स्पर्धा संपन्न

आज दि.18-08-2023 सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थे मार्फत शिंदखेडा ब्राथल येथे महिलां करिता रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. यात महिलांनी सहभाग नोंदविला.






# सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे

## राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस नियंत्रण कार्यक्रम धुळे

## सन - २०२३-२४

| अ.क्र. | दिनांक | ठिकाण | एकूण तपासणी | पॉझिटीव्ह |
|---|---|---|---|---|
| १ | ०५/०३/२०२४ | बोरसे कॉलोनी, धुळे | १०० | ०० |
| २ | ०६/०३/२०२४ | पळासनेर ता.शिरपूर जि.धुळे | १०० | ०० |
| ३ | ०७/०३/२०२४ | वडजाई रोड, धुळे | १०३ | ०० |
| ४ | ०८/०३/२०२४ | नेर ता.जि. धुळे | १०० | ०० |
| ५ | ०९/०३/२०२४ | चितोड ता.जि. धुळे | १०० | ०० |
| ६ | ११/०३/२०२४ | होळ ता. शिंदखेडा जि. धुळे | १०१ | ०१ |
| ७ | १२/०३/२०२४ | अजंग ता.जि. धुळे | १०० | ०० |
| ८ | १३/०३/२०२४ | सोनगीर ता.जि. धुळे | १०० | ०० |
| ९ | १४/०३/२०२४ | बोरविहीर ता.जि. धुळे | १०० | ०० |
| १० | १५/०३/२०२४ | हिसाळे ता. शिरपूर जि. धुळे | १०० | ०० |
| ११ | १६/०३/२०२४ | महिर ता. साक्री जि. धुळे | १०० | ०० |
| १२ | १८/०३/२०२४ | साक्री रोड, धुळे | १०० | ०० |
| १३ | १९/०३/२०२४ | दहिवद ता. शिरपूर जि. धुळे | १०० | ०० |
| १४ | २०/०३/२०२४ | वालखेडा ता.शिंदखेडा जि. धुळे | १०० | ०० |
| १५ | २१/०३/२०२४ | कुसुंबा ता.जि. धुळे | १०० | ०० |
| १६ | २२/०३/२०२४ | सांजोरी ता.जि. धुळे | १०० | ०० |
| १७ | २३/०३/२०२४ | अहिल्यापूर ता. शिरपूर जि. धुळे | १०० | ०० |
| १८ | २६/०३/२०२४ | किस्मत नगर, शिरपूर | १०० | ०० |
| १९ | २७/०३/२०२४ | एकता नगर, धुळे | १०० | ०० |
| २० | २८/०३/२०२४ | दंडेवालेबाबा नगर, मोहाडी | १०० | ०० |
| | | **एकूण** | **२००४** | **०१** |

**दिनांक :- ०५/०३/२०२४** **ठिकाण :- बोरसे कॉलनी, धुळे**

राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायसिस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत धुळे जिल्ह्यातील अतिजोखमीच्या गटातील लोकांची मोफत हिपॅटायटीस बी व सी तपासणी शिबिराचे आयोजन दि. ०५/०३/२०२४ रोजी बोरसे कॉलनी, धुळे परिसरात सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत करण्यात आले. त्यात लोकांची तपासणी मोफत करण्यात आली तसेच आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमात सिव्हील हॉस्पिटलचे लॅब टेक्निशियन श्री.अरविंद देसाई, श्री.पंडित देवरे, मनपा ICTC चे लॅब टेक्निशियन श्री. प्रवीण पालोदकर, डॉ.खुशबू कटारिया यांनी तपासणी केली. संस्थेचे श्री. हिरालाल भोसले, संजय सैतवाल, सिमरन शेख, रशिदा शेख, काजल सोलंकी, फजलू अन्सारी, मोइनुद्दिन शेख यांनी परिश्रम घेतले, तर कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.





**दिनांक :- ०७/०३/२०२४** **ठिकाण :- वडजाई रोड, धुळे**

राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायसिस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत धुळे जिल्ह्यातील अतिजोखमीच्या गटातील लोकांची मोफत हिपॅटायटीस बी व सी तपासणी शिबिराचे आयोजन दि.०७/०३/२०२४ रोजी वडजाई रोड, धुळे परिसरात सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत करण्यात आले. त्यात लोकांची तपासणी मोफत करण्यात आली तसेच आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमात सिव्हील हॉस्पिटलचे लॅब टेक्निशियन श्री.अरविंद देसाई, मनपा ICTC चे लॅब टेक्निशियन श्री. प्रवीण पालोदकर, डॉ.हेमराज पाटील यांनी तपासणी केली. संस्थेचे श्री. हिरालाल भोसले, संजय सैतवाल, लतीफ शेख, सिमरन शेख, रशिदा शेख, काजल सोलंकी, फजलू अन्सारी यांनी परिश्रम घेतले, तर कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.






**दिनांक :- ०९/०३/२०२४** **ठिकाण :- चितोड, ता.जि. धुळे**

राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायसिस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत धुळे जिल्ह्यातील अतिजोखमीच्या गटातील लोकांची मोफत हिपॅटायटीस बी व सी तपासणी शिबिराचे आयोजन दि.०९/०३/२०२४ रोजी चितोड, ता.जि.धुळे परिसरात सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत करण्यात आले. त्यात लोकांची हिपॅटायटीस बी व सी तपासणी मोफत करण्यात आली तसेच आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमात सिव्हील हॉस्पिटलचे लॅब टेक्निशियन श्री.पंडित देवरे, मनपा ICTC चे लॅब टेक्निशियन श्री. प्रवीण पालोदकर, डॉ.खुशबू कटारिया यांनी तपासणी केली. संस्थेचे श्री. हिरालाल भोसले, संजय सैतवाल, रशिदा शेख, सिमरन शेख, काजल सोलंकी, यांनी परिश्रम घेतले, तर कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.






**दिनांक :- १२/०३/२०२४** **ठिकाण :- अजंग, ता.जि. धुळे**

राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायसिस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत धुळे जिल्ह्यातील अतिजोखमीच्या गटातील लोकांची मोफत हिपॅटायटीस बी व सी तपासणी शिबिराचे आयोजन दि.१२/०३/२०२४ रोजी अजंग, ता.जि.धुळे येथे सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत करण्यात आले. त्यात लोकांची हिपॅटायटीस बी व सी तपासणी मोफत करण्यात आली तसेच आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमात सिव्हील हॉस्पिटलचे लॅब टेक्निशियन श्री.अरविंद देसाई, मनपा ICTC चे लॅब टेक्निशियन श्री. प्रवीण पालोदकर यांनी तपासणी केली. संस्थेचे श्री. हिरालाल भोसले, विशाल साळुंखे, रेखा, शिरुळे, सुषमा आगळे यांनी परिश्रम घेतले, तर कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.





**दिनांक :- १३/०३/२०२४** **ठिकाण :- सोनगिर, ता.जि. धुळे**

राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायसिस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत धुळे जिल्ह्यातील अतिजोखमीच्या गटातील लोकांची मोफत हिपॅटायटीस बी व सी तपासणी शिबिराचे आयोजन दि.१३/०३/२०२४ रोजी सोनगिर, ता.जि.धुळे येथे सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत करण्यात आले. त्यात लोकांची हिपॅटायटीस बी व सी तपासणी मोफत करण्यात आली तसेच आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमात सिव्हील हॉस्पिटलचे लॅब टेक्निशियन श्री.अरविंद देसाई, सोनगिर ICTC चे समुपदेशक सौ.शीतल पाटील, लॅब टेक्निशियन श्री. कैलास वाडीले यांनी तपासणी केली. संस्थेचे श्री. हिरालाल भोसले, संजय सैतवाल, भुवनेश्वरी सोनवणे, रेखा, शिरुळे, निलेश बैसाणे, उदय अहिरे यांनी परिश्रम घेतले, तर कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.





धुळे सिटी 17-03-2024

दैनिक दिव्य मराठी
दिव्य सिटी
रमज़ान : ०६
उद्याची सहेरी 5.14 पहाटे | आजचा इफ्तार 6.46 सायंकाळी
महाराष्ट्राचे एकमेव स्वतंत्र वृत्तपत्र
धुळे, रविवार, १७ मार्च २०२४ | फाल्गुन शु.८, शके १९४५

# सोनगीरला दोनशे जणांची तपासणी



सोनगीर येथे मोफत आरोग्य तपासणी करताना डॉक्टर.

**प्रतिनिधी** | सोनगीर

अंजना हार्ट केअर हॉस्पिटल, एकलव्य आदिवासी बहुउद्देशीय संस्था, सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था व जनसेवा फाउंडेशनतर्फे आरोग्य शिबिर झाले. त्यात दोनशे जणांची मोफत तपासणी करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात हे शिबिर झाले.

या वेळी सरपंच रंजना मोरे, उपसरपंच लखन ठेलारी उपस्थित होते. शिबिरात रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग , शरीर स्थूलतेची तपासणी करण्यात आली. सिकलसेलची तपासणी मोफत करून मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. भूपेंद्र अहिरे, तृप्ती शिंदे, समुपदेशक तथा मार्गदर्शक संजय सैतवाल, भुवनेश्वरी सोनवणे, रेखा शिरुडे, नीलेश बैसाणे आदींनी तपासणी केली. सामाजिक बांधिलकीतून हा उपक्रम राबवण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

# ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिन कार्यक्रम संपन्न.

ठिकाण:- उपजिल्हा रुग्णालय, दोंडाईचा                                    दि.०१/१२/२०२३




उपजिल्हा रुग्णालय दोंडाईचा येथे समुपदेशक श्री.योगेश पवार यांनी रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना HIV एड्स विषयी माहिती देतांना.




उपजिल्हा रुग्णालय दोंडाईचा येथे जागतिक एड्स दिनानिमित १०९७ या टोल फ्री क्रमांकाची जनजागृती करतांना.

# ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त ऑटो कॅम्पियन

ठिकाण:- वडजाई रोड जि. धुळे    दि. १४/१२/२०२३

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई सहाय्यित सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था, धुळे प्रिव्हेन्शन डिविजन प्रकल्पांतर्गत ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त वडजाई रोड येथे रिक्षांवर HIV/AIDS टोल फ्री नं.१०९७ चे स्टिकर लावून जनजागृती करण्यात आली.

आजचा कार्यक्रम हा सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था, धुळे अध्यक्षा सौ. मिना भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. सदर कार्यक्रमामध्ये संस्थेचे श्री.हिरालाल भोसले, श्री. संजय सैतवाल, श्री. लतीफ शेख, रशिदा शेख, जावीद पठाण, आय सी टी सी चे प्रयोगशाळा तंत्रज्ञ,श्री. प्रविण पालोदकर उपस्थित होते.



**०१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त वडजाई रोड येथे रिक्षांवर HIV/AIDS टोल फ्री नं.१०९७ चे स्टिकर लावून जनजागृती करण्यात आली.**



# जागतिक एड्स दिनानिमित्त विधी सेवा प्राधिकरण व सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने जनजागृती कार्यक्रम संपन्न

अर्थे ता. शिरपूर दि.१५/१२/२०२३

विधी सेवा प्राधिकरण व सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे तसेच ICTC शिरपूर यांचे संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई सहाय्यित लक्षगट हस्तक्षेप प्रकल्प व लिंक वर्कर प्रकल्पांतर्गत अर्थे ग्रामपंचायत येथे दि.१५/१२/२०२३ रोजी कायदेविषयक मार्गदर्शन व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रथम सर्वांचे स्वागत करण्यात आले.

आजच्या कार्यक्रमात विधी सेवा प्राधिकरण तालुका गटाचे ॲड.सौ.योगिता पवार यांनी महिलांना मार्गदर्शन करतांना सांगितले महिलांवर अन्याय अत्याचार होत असेल तर आपणा करिता कायदे आहेत आपण न्यायालयात अर्ज करून दाद मागू शकतात. विधी सेवा प्राधिकरण मार्फत महिलांकरिता असलेल्या मोफत सेवा विषयी मार्गदर्शन केले.

जागतिक एड्स दिन पंधरवडा निमित्त सर्वांनी शपथ घेतली.

श्री.दीपक गुजर सरपंच यांनी बोलतांना सांगितले अर्थे गावात सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेमार्फत राबविलेला आजचा उपक्रम हा चांगला घडवून आणला. गावातील स्त्री पुरुषांना नक्कीच याचा फायदा होणार आहे, याठिकाणी सर्वांनी रक्त तपासणी करून घेऊन आपले स्टेटस जाणून घेतले. आयुष्यमान भारत कार्ड याठिकाणी गावकऱ्यांचे काढून देण्यात आले. महिलांचे कायदेविषयक माहिती ॲड.सौ.योगिता पवार यांनी दिली. संस्थेच्या कार्यास शुभेच्छा दिल्यात व असेच पुढे अर्थे गावात मोठमोठे कार्यक्रम आपण घडवून आणावे असे सांगितले.

सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेचे श्री.हिरालाल भोसले व श्री.संजय सैतवाल यांनी संस्थेचे लिंक वर्कर प्रकल्प, लक्षगट हस्तक्षेप प्रकल्प व विविध उपक्रमांविषयी माहिती दिली तसेच सोशल बेनेफिट संस्थेकडून उपलब्ध करून दिले जातात असे सांगितले.

आर.आर.सी. मेम्बर श्री.सचिन जाधव यांनी कार्यक्रमात सर्वांचे आभार मानले.

आजचा कार्यक्रम सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था अध्यक्षा सौ.मीना भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमात तालुका विधिसेवा प्राधिकरणचे ॲड.सौ.योगिता पवार ॲड.जितेंद्र पवार अर्थे गावचे ग्रामसेवक श्री.बी.एन.देवरे, श्री.नंदू गवळे लिपिक ग्रा.पं. तसेच ग्रामस्थ व शिरपूर ICTC चे समुपदेशक श्री.नानाभाऊ बडगुजर लॅब टेक्निशियन श्री.सतीश माळी, श्री.प्रविण पवार आयुष्यमान कार्ड ऑपरेटर श्री.सचिन पवार, आरोग्य सेवक श्री.सैय्यद, संस्थेचे समुपदेशक श्री.संजय सैतवाल, लिंक वर्कर सुपरवायझर श्री.झेलर पावरा, सौ.मनीषा वाघ, सौ.आशा वाघ, सौ.सरला ढोले, सौ.वर्षा अहिरे, संगीता पाटील, प्रतिभा देवरे, श्री.लोटन करनकाळ, निखील बिऱ्हाडे, श्री.मनोज भोई यांचे मोलाचे सहकार्य लाभले

आजच्या कार्यक्रमात HIV तपासणी ३०, आरोग्य तपासणी ४०, आयुष्यमान कार्ड ३० काढून देण्यात आले.

# जागतिक एड्स दिनानिमित्त विधी सेवा प्राधिकरण व सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने जनजागृती कार्यक्रम संपन्न

अर्थे ता. शिरपूर दि.१५/१२/२०२३




सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेचे समुपदेशक श्री.संजय सैतवाल यांनी संस्थेचे लिंक वर्कर प्रकल्प, लक्षगट हस्तक्षेप प्रकल्प व विविध उपक्रमांविषयी माहिती देतांना.




सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेचे लिंक वर्कर प्रकल्प, लक्षगट हस्तक्षेप प्रकल्पचे कर्मचारी तसेच गावातील नागरिक HIV एड्सविषयी शपथ घेतांना.

जळगाव । शनिवार
२३.१२.२०२३
किंमत : ₹ ५ ■ वर्ष : ४६ अंक : ९ ■ धुळे : पृष्ठे : १२+४=१६
आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र.३५८५३/१९७७
www.lokmat.com
epaper.lokmat.com

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत



# कायदेविषयक मार्गदर्शन आणि आरोग्य शिबिर

## शिरपूर तालुक्यातील अर्थे येथे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** शिरपूर तालुक्यातील अर्थे ग्रामपंचायतीत शुक्रवारी कायदेविषयक मार्गदर्शन व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

विधिसेवा प्राधिकरण व सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था, तसेच ICTC शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई सहाय्यित लक्षगट हस्तक्षेप प्रकल्प व लिंक वर्कर प्रकल्पांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात विधिसेवा प्राधिकरण तालुका गटाच्या ॲड. योगिता पवार यांनी विधिसेवा प्राधिकरणामार्फत महिलांकरिता असलेल्या मोफत सेवाविषयी मार्गदर्शन केले.

जागतिक एड्स दिन पंधरवड्यानिमित्त सर्वांनी शपथ घेतली. सरपंच दीपक गुजर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

यावेळी सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेचे हिरालाल भोसले व संजय सैतवाल यांनी संस्थेचे लिंक वर्कर प्रकल्प, लक्षगट हस्तक्षेप प्रकल्प व विविध उपक्रमांविषयी माहिती दिली, सचिन जाधव यांनी आभार मानले.

कार्यक्रम सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था अध्यक्षा मीना भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. कार्यक्रमात ॲड. जितेंद्र पवार, अर्थे गावचे ग्रामसेवक बी.एन.देवरे, नंदू गवळे लिपिक ग्रा.पं., शिरपूर ICTC चे समुपदेशक नाना बडगुजर लॅब टेक्निशियन सतीश माळी, प्रवीण पवार, आयुष्यमान कार्ड ऑपरेटर सचिन पवार, आरोग्य सेवक सय्यद, संस्थेचे समुपदेशक संजय सैतवाल, लिंक वर्कर सुपरवायझर झेलर पावरा, मनीषा वाघ, आशा वाघ, सरला ढोले, वर्षा अहिरे, संगीता पाटील, प्रतिभा देवरे, लोटन करनकाळ, निखिल बिऱ्हाडे, मनोज भोई यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# चाईल्डलाईन प्रकल्प 1098

महिला व बाल विकास मंत्रालय नवी दिल्ली सहाय्यीत चाईल्ड लाईन इंडिया फांऊडेशन संचालित सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे अंतर्गत  २०१९ पासून चाईल्ड लाईन 1098 हा प्रकल्प धुळे जिल्ह्यातील  0 ते 18 वयोगटातील बालकांसाठी कार्यरत आहे. चाइल्डलाइन 1098 हा एक फोन नंबर आहे जो भारतातील लाखो मुलांसाठी आशा जागवतो.  चाईल्ड लाईन 1098 सर्वच बालकांना प्रतिसाद देते परंतु काळजी व संरक्षणाची गरज असणाऱ्या, असुरक्षित क्षेत्रात राहणाऱ्या बालकांवर अधिक लक्ष केंद्रात करते. हे दिवसाचे 24 तास, वर्षातील 365 दिवस, मदत आणि मदतीची गरज असलेल्या मुलांसाठी विनामूल्य, आपत्कालीन फोन सेवा आहे. आम्ही केवळ मुलांच्या आपत्कालीन गरजांना प्रतिसाद देत नाही तर त्यांना त्यांच्या दीर्घकालीन काळजी आणि पुनर्वसनासाठी संबंधित सेवांशी जोडतो.

**चाईल्ड लाईन 1098 बालकांच्या या समस्यांना प्रतिसाद देते.**

**व्यसनमुक्ती**

घरात मोठी व्यक्ती व्यसनाधीन असेल तर मुले त्यांचे अनुकरण करतात. तसेच आपल्या वयापेक्षा मोठ्या किंवा बरोबरीच्या व्यसनाधीन मुलांच्या संगतीने ती व्यसनाधित होतात. यातील अनेक बालकांना पेट्रोलचा वास घेणे, दारु पिणे, गुटखा खाणे अशा सवयी असणाऱ्यांबाबत चाईल्ड लाईनकडे मदतीसाठी दूरध्वनी आले. अशा अनेक मुलांना चाईल्ड लाईनने समुपदेशन व मानसोपचारतज्ज्ञाचे मार्गदर्शन याद्वारे पुनर्वसन केले.

**बाल भिक्षेकरी**

चाईल्ड लाईनन आजपर्यंत बऱ्याच बाल भिक्षेकरी मुलांचे पुनर्वसन केले आहे. कधी घरची परिस्थिती बिकट असल्याने आई-वडील मुलांना भीक मागायला पाठवितात. मुलांना पैशाचे आकर्षण असते म्हणून भीक मागितली जाते. अशा स्थितीत चाईल्ड लाईन प्रथम धाडी टाकते व यात सापडलेल्या मुलांना व त्यांच्या पालकांना समज दिली जाते.

**बाल विवाह**

चाईल्ड लाईनकडे वर्षभरात ४२बालविवाहाची प्रकरणे आली बालविवाह करणाऱ्यांमध्ये .आदिवासी समाजाचे प्रमाण जास्त असते असे दिसून आले चाईल्ड लाईनने धाडी टाकून .३९ मुलींचे बालविवाह थांबविले आहेत यात .साक्री,धुळे, शिरपूर, शिंदखेडा तालुक्यातील बालविवाहांचा समावेश आहे . बालविवाहाच्या कारणांमध्ये घरची परिस्थिती गरीब असणे, प्रेमप्रकरणांची कुणकुण लागल्यास कुटुंबाच्या - प्रतिष्ठेचा विचार, कुटुंबात भावंडाची संख्या जास्त असल्यास जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी बालविवाह केले जाततबा .लविवाहाचा मुलीवर मानसिक व शारिरीक विपरीत परिणाम होतो.

**लैगिक शोषण**

अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये चाईल्ड लाईन संस्था शोषित मुलींना व त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन करते. पुन्हा नव्याने आयुष्यात पुढे जगण्यासाठी प्रोत्साहित करते. शोषितांच्या शारिरीक व मानसिक स्थितीचा विचार करुन चाईल्ड लाईन पुनर्वसनाचे काम करते.

पीडितांना सरकारी योजनांपर्यंत पोहोचविण्याचे व मानसिक आधार देऊन कायदेशीर कारवाईबाबत सहकार्य करते. एकूणच काय तर बालकांचे बालपण जपण्यासाठी चाईल्ड लाईन धडपडत असतेजर  . एखाद्या बालकाचे बालपण खुडले जात असेल, उध्वस्त होत असेल तर त्याच्या मदतीसाठी आपणही डायल करा 1098.

**बाल मजूर**

इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या मते, असे कोणतेही काम जे मुलाच्या बालपणावर परिणाम करते, मुलाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवते, त्यांची क्षमता कमी करते आणि जे काम मुलाची शारीरिक आणि मानसिक स्थिती बिघडते, ते सर्व बालमजुरीचे प्रतिनिधित्व करतात. यात अशा कृत्यांचाही समावेश आहे

ज्यामुळे मुलांना सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या दुखापत होते.जेव्हा एखाद्या मुलाला शाळा सोडण्यास भाग पाडले जाते तेव्हा बालमजुरी देखील होते. मुलांना त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त काम देणे देखील बालमजुरी अंतर्गत येते. गरिबीमुळे बालमजुरीचे प्रमाण अधिक आहे.

भारतात, 2016 च्या बालकामगार (प्रतिबंध आणि विनियमन) सुधारणा अधिनियमांतर्गत, वयाची चौदा वर्षे पूर्ण न केलेल्या व्यक्तीला बालकाचा दर्जा दिला जातो.

भारतात बालमजुरीचे प्रमाण सर्वाधिक आहे ही खेदाची बाब आहे. शहरी भागात अल्पवयीन मुलांना नोकर म्हणून ठेवले जाते. मुलांना खूप वाईट पद्धतीने काम करायला लावले जाते, काहीवेळा त्यांना अन्नाशिवाय काम करावे लागते, त्यांना कमी वेतन मिळते आणि त्यांना वाईट वागणूक दिली जाते. यामुळेच लहान मुलांवरील शारीरिक, मानसिक आणि लैंगिक अत्याचाराची प्रकरणे समोर येतात. कामगार मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, ढाबे, चहाची दुकाने, रेस्टॉरंट इत्यादींमध्ये मुलांना काम करायला लावणे हा गुन्हा मानण्यात आला आहे.

**अत्याचार आणि हिंसा**

शारीरिक शोषण म्हणजे मुलांवरील हिंसाचार होय. बाल शोषण म्हणजे एखाद्या मुलाला जाणूनबुजून शारीरिक इजा पोहोचवण्याचा चुकीचा प्रयत्न, जसे की थप्पड मारणे, एखाद्या वस्तूने मारणे, ठोसा मारणे, लाथ मारणे, थरथरणे, लाथ मारणे, कापणे, जाळणे किंवा जास्त कठोर असणे. जेव्हा मुलाकडे दुर्लक्ष केले जाते तेव्हा शारीरिक शोषण देखील होते, याचा अर्थ काळजीचा अभाव आहे, मूलभूत गरजा जसे की योग्य अन्न आणि संरक्षण प्रदान केले जात नाही. यासोबतच विषप्रयोग करणे किंवा मुलाला बुडवून मारण्याचा चुकीचा प्रयत्न करणे यात गैरवर्तन आणि हिंसा देखील समाविष्ट आहे, ज्यामुळे मूल आजारी पडू शकते किंवा मृत्यूही होऊ शकतो.

**भारतात बाल तस्करी**

युनिसेफच्या मते, तस्करीला बळी पडलेले मूल म्हणजे 18 वर्षांखालील कोणतीही व्यक्ती ज्याची भरती, वाहतूक, हस्तांतरित, आश्रय किंवा शोषणाच्या उद्देशाने, देशाच्या आत किंवा बाहेर, प्राप्त केले जाते. महिला मुलांची तस्करी लग्न, देहविक्री, गुन्हेगारी क्रियाकलाप, दत्तक घेणे आणि अवयवांच्या व्यापारासाठी केली जाते तर पुरुष मुलांची तस्करी प्रामुख्याने मजुरीसाठी केली जाते आणि भिकारी म्हणून त्यांचे शोषण केले जाते. काहीवेळा, तस्करी झालेल्या मुलांना सशस्त्र गटांमध्ये किंवा गुन्हेगारी कृत्यांसाठी देखील भरती केले जाते.

**भारतातील हरवलेली मुले**

दरवर्षी असंख्य मुले बेपत्ता होतात. हरवलेल्या मुलांच्या श्रेणीमध्ये अनेक संभाव्य कारणांचा समावेश होतो जसे की कुटुंबातील सदस्यांकडून मुलांचे अपहरण किंवा अपहरण करणे, कुटूंबातील सदस्य नसलेले, पळून गेलेली मुले किंवा कुटुंब आणि आजूबाजूच्या परिस्थितीमुळे पळून जाण्यास भाग पाडणारी मुले, कठीण परिस्थितीत असलेली मुले. किंवा आक्रमक वातावरण, तस्करी झालेली मुले किंवा हरवलेली मुले. हरवलेली मुले अनेकदा गरिबीत रस्त्यावर येतात.

पळून जाणारे मूल त्यांच्या घरातून किंवा त्यांच्या काळजीवाहकांपासून पळून जाण्याची अनेक कारणे आहेत. हे काम शोधणे, घरी आजारी उपचारांपासून दूर राहणे किंवा चांगल्या जीवनाच्या आश्वासनांसह शहराच्या दिव्यांचे अनुसरण करणे असू शकते. पालकांच्या दुर्लक्षामुळे किंवा अकार्यक्षम कुटुंबांमुळे मुलांइतकीच मुली घरातून पळून जाण्याची शक्यता असते. त्यांच्यापैकी बरेच जण देशाच्या रेल्वे प्लॅटफॉर्मवर उतरतात, जिथे ते जगण्यासाठी भीक मागतात, चोरी करतात किंवा गाड्या झाडणे यासारखी क्षुल्लक कामे करतात. बऱ्याचदा, ते बाल तस्करांना बळी पडतात किंवा इतर प्रकारच्या शोषणाला बळी पडतात.

**भारतातील बालशिक्षण**

गरिबीतून सुटण्यासाठी, उपजीविका मिळवण्यासाठी किंवा अतिरिक्त उत्पन्न मिळविण्यासाठी भारतातील अनेक मुले त्यांचे शिक्षण आणि शालेय शिक्षण सोडून देतात. अनेक मुलं कधीच शाळेत जात नाहीत, आणि जर ते आले तर ते शाळा सोडतात किंवा इतरत्र काम करण्यासाठी लवकर सोडतात. या कारणांमुळे, साक्षरतेचे प्रमाण कमी राहते आणि त्यामुळे अनेक मुले सामाजिक आणि आर्थिक शोषणास बळी पडतात.

**कायद्याच्या विरोधातील मुले**

युनिसेफच्या मते, 'कायद्याच्या विरोधातील मुले' हा शब्द 18 वर्षांखालील कोणत्याही व्यक्तीला सूचित करतो जो गुन्हा करण्यासाठी न्याय व्यवस्थेच्या संपर्कात आला आहे किंवा गुन्हा केल्याचा संशय आहे. कायद्याच्या विरोधात असलेल्या बहुतेक मुलांनी क्षुल्लक गुन्हे केले आहेत जसे की हलगर्जीपणा, ट्रॅन्सी, भीक मागणे किंवा दारू वापरणे. पण असे काही आहेत ज्यांनी खून किंवा लैंगिक अत्याचारासारखे गंभीर गुन्हे केले आहेत. काही मुलांना प्रौढांकडून गुन्ह्यात भाग पाडले जाते, हे माहीत आहे की मुले हलक्या शिक्षेने सुटतील.

भारतात, कायद्याच्या विरोधात असलेली मुले बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015 द्वारे नियंत्रित केली जातात ज्याने पूर्वीचा बाल न्याय कायदा, 2015 ची जागा घेतली. हा कायदा आरोप असलेल्या किंवा कायद्याशी संघर्षात सापडलेल्या मुलांशी संबंधित आहे आणि काळजीची गरज असलेल्या मुलांना त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करून, बाबींवर निर्णय घेण्यासाठी आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी बाल-अनुकूल दृष्टिकोन स्वीकारून त्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करते. कायद्याच्या विरोधात असलेल्या मुलांना किंवा बालगुन्हेगारांना प्रत्येक शहरातील बाल न्याय मंडळासमोर हजर करावे लागते. ही वैधानिक संस्था बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015 अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. तथापि, अनेक प्रकरणांमध्ये मुलांची पोलिसांकडे तक्रार केली जाते, जे नंतर प्रत्येक प्रकरणासाठी सेट केलेल्या प्रोटोकॉलचे पालन करतात. काही प्रकरणांमध्ये मुलांना कायदेशीर आधार दिला जातो.

अशा प्रकरणा मध्ये चाईल्ड लाईन 1098 मुलांच्या हक्कांचे रक्षण करते.

**भारतातील बेघर मुले**

भारतातील शहरी आणि शहरांमध्ये घर नसलेली मुले ही एक मोठी समस्या आहे. अशी अनेक मुलं रेल्वे स्थानकांवर, मंदिरांजवळ, दर्ग्यांजवळ, बाजारपेठेत, पुलांखाली, बस डेपोजवळ आणि थांब्यांजवळ आणि इतर ठिकाणी आढळतात. या मुलांना स्थिर घर किंवा निवारा नसतो आणि त्यांच्यापैकी काहींना कौटुंबिक संबंध नाहीत. ते अत्याचार आणि अमानुष वागणुकीचे सहज बळी ठरतात आणि आर्थिक जगण्यासाठी अनेकदा किरकोळ चोरी किंवा वेश्याव्यवसायात गुंतलेले असतात.

मुलांना रस्त्यावर राहण्यास प्रवृत्त करणारे अनेक घटक आहेत. ओळखले गेलेले एक मूळ कारण म्हणजे गरिबी. बऱ्याचदा, अशी मुले आहेत जी पळून जातात - अपमानास्पद किंवा धोकादायक वातावरणातून पळून गेलेली किंवा शहरांमध्ये चांगल्या नोकरीसाठी घरातून पळून गेलेली. जवळजवळ 50% रस्त्यावरील मुले रॅग-विक्रेते, फेरीवाले आणि शूशाइन मुले म्हणून स्वयंरोजगार करतात, तर इतर दुकाने आणि आस्थापनांमध्ये काम करतात. त्यांचे कामाचे तास दिवसाचे 10-13 तास असतात. या बालकांना अस्वच्छ राहणीमानामुळे आरोग्यास धोका निर्माण होतो आणि त्यांना निवारा नसल्यामुळे

त्यांना सतत उष्णता, थंडी आणि पाऊस या पर्यावरणीय परिस्थितीचा सामना करावा लागतो. सार्वजनिक ठिकाणी राहणाऱ्या अनेक बेघर मुलांनाही पालिका अधिकारी आणि पोलिसांकडून त्रास सहन करावा लागतो.

पीडितांना सरकारी योजनांपर्यंत पोहोचविण्याचे व मानसिक आधार देऊन कायदेशीर कारवाईबाबत सहकार्य करते. एकूणच काय तर बालकांचे बालपण जपण्यासाठी चाईल्ड लाईन धडपडत असतेजर . एखाद्या बालकाचे बालपण खुडले जात असेल, उध्वस्त होत असेल तर त्याच्या मदतीसाठी आपणही डायल करा 1098.

## ❖ Childline 1098 Total Cases for 2023-24

| Sr. No | Case Category | Total Case |
|---|---|---|
| 1 | Child Marriage | 12 |
| 2 | Child Labor | 07 |
| 3 | Beggar | 11 |
| 4 | Protection Form Abuse | 01 |
| 5 | Counselling | 02 |
| 6 | Death Related | 00 |
| 7 | Education Help | 01 |
| 8 | Emotional Support & Guidance | 06 |
| 9 | Lost & Found | 02 |
| 10 | Medical Help | 01 |
| 11 | Missing | 00 |
| 12 | Nutrition Kit | 01 |
| 13 | Other Intervention | 101 |
| 14 | Parent Asking Help | 04 |
| 15 | Sexual Abuse | 00 |
| 16 | Shelter | 02 |
| 17 | Sponsership | 00 |
| | **Total** | **151** |

# Open House Programme

| अ.क्र. | दिनांक | ठिकाण | लाभार्थी बालक | लाभार्थी व्यक्ती | भागधारक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२-०४-२०२३ | वरखेडीता. धुळे | २५ | ०७ | ०४ |
| २ | २६-०४-२०२३ | सांजोरी ता.धुळे | ३० | ०९ | ०१ |
| ३ | १०/०५/२०२३ | फागणे धुळे | १९ | २२ | ०५ |
| ४ | २२/०५/२०२३ | उडाने ता. धुळे | ३२ | ०८ | ०५ |
| ५ | ३०/०५/२०२३ | गोंदूर ता.धुळे | २५ | ०६ | ० १ |
| ६ | ०२/०६/२०२३ | सोनगीर धुळे | २९ | ०६ | ०० |
| ७ | १४/०६/२०२३ | नगाव ता.धुळे | ३५ | ०१ | ०१ |
| ८ | ३०/०६/२०२३ | मोगलाई धुळे | ३१ | ०० | ०३ |
| ९ | ०८/०७/२०२३ | दोंडाईचा | ३० | ३० | ०३ |
| १० | २३/०७/२०२३ | इंदिरा नगर धुळे | २० | ०० | ०४ |
| ११ | २७/०७/२०२३ | रमाई नगर धुळे | ३५ | ३० | ०८ |
| एकुण | | | ३११ | ११९ | ३५ |

# ओपन हाउस कार्यक्रम




**चाईल्ड हेल्पलाईन १०९८ प्रकल्पांतर्गत इंदिरानगर येथे ओपन हाउस कार्यक्रम घेतांना चाईल्ड हेल्पलाईन टीम.**



## कनोसा कॉन्वेंट हायस्कूल धुळे याठिकाणी बाल संरक्षण कायदा याविषयी,मार्गदर्शन

कनोसा कॉन्वेंट हायस्कूल धुळे याठिकाणी बाल संरक्षण कायदा याविषयी सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले मार्गदर्शन केले . त्यामध्ये १२०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तसेच मुलांना गुड टच बॅड टच, पोक्सो कायदा-२०१२, बाल विवाह प्रतिबंध कायदा – २००६, Child Trafficking, बाल विवाह याविषयी सखोल अशी माहिती देऊन मुलांनी अशा गंभीर परिस्थितीच्या वेळेस १०९८ या टोल फ्री क्रमांकावर फोन करावा यासंबंधी मार्गदर्शन केले.



**कनोसा कॉन्वेंट हायस्कूल धुळे याठिकाणी बाल संरक्षण कायदा याविषयी सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले मार्गदर्शन करतांना**



**कनोसा कॉन्वेंट हायस्कूल धुळे याठिकाणी बाल संरक्षण कायदा याविषयी सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले यांचे मार्गदर्शन ऐकतांना शाळेचे विद्यार्थी.**

# बालविवाह विषयक कार्यक्रम

सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्था धुळे मार्फत पंचायत समिती साक्री येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात साक्री तालुक्यातील १८० अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी विशेष सहभाग नोंदवला. ग्रामीण भागामध्ये कमी वयातील मुलामुलींचे विवाह होणे हे कायदे गुन्हा आहे तसेच पोक्सो कायदा-२०१२, बाल विवाह प्रतिबंध कायदा – २००६, Child Trafficking, मोबाईलचा अति वापर अशा विविध मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यात आले.






लोकमत हॅलो धुळे
बुधवार ३०.१०.२०२४
https://epaper.lokmat.com

## बालविवाहमुक्त भारतासाठी जनजागृती

### तज्ज्ञांचे मार्गदर्शन; सप्तश्रृंगी महिला संस्था व पोलिसांचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्था व पोलिस प्रशिक्षण केंद्र धुळे यांच्या संयुक्त विद्यमानाने बालविवाहमुक्त भारत कार्यक्रम पोलिस प्रशिक्षण केंद्र धुळे येथे घेण्यात आला. यावेळी पोलिसांनी महिला व बाल विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी बालविवाहमुक्त भारतविषयी प्रतिज्ञेचे सर्वांकडून वाचन करून प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच बालविवाहाची माहिती मिळाल्यास १०९८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पोलिस प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य राहुल फुल्ला, तसेच पोलिस निरीक्षक माधवी वाघ, जयवंत पगारे, सतीश वळवी उपस्थित होते.यानंतर जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या तृप्ती पाटील यांनी बालविवाह हाताळताना येणाऱ्या अडचणींवर मार्गदर्शन केले. ॲड. भाग्यश्री वाघ यांनी बालकांसाठीचा पोक्सो कायदा याविषयी पोलिस प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच ॲड. गायत्री भामरे यांनी पोलिस प्रशिक्षणार्थ्यांना बालविवाहामुळे बालकांच्या शरीरावर काय परिणाम होतो, त्यामुळे पुढे भविष्यात काय काय अडचणी येतात, याविषयी माहिती दिली.

प्रतीक्षा मगर यांनी काळजी व संरक्षण असलेल्या बालकांसंबंधी चाइल्ड हेल्पलाइन १०९८ याविषयी माहिती दिली तसेच त्यात चाइल्डलाइन व पोलिसांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. 'बालविवाहमुक्त भारत' याविषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमात हिरालाल भोसले यांनी बालविवाहमुक्त भारत विषयी प्रतिज्ञेचे सर्वांकडून वाचन करून प्रतिज्ञा घेण्यात आली. बालविवाहाची माहिती मिळाल्यास १०९८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले.

जळगाव । बुधवार
१९.४.२०२३
किंमत : ₹ ५ ■ वर्ष : ४५ अंक : १२४ ■ धुळे : पृष्ठे : १२+४=१६
आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र.३५८५३/१९७७
www.lokmat.com
epaper.lokmat.com

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

बाल विवाह संदर्भात हेल्पलाईनवर तक्रार करण्याचे आवाहन

# जिल्ह्यात सहा महिन्यांत रोखले २० बालविवाह

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** केंद्र शासन पुरस्कृत महिला व बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली सहायित सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेंतर्गत चालणाऱ्या चाइल्ड हेल्पलाइन १०९८ क्रमाकांवर जिल्ह्यात अल्पवयीन बालकांचा बालविवाह होणार असल्याच्या माहितीनुसार जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाइल्डलाइन यांच्या सतर्कतेने ६ महिन्यांत २० बालकांचे बालविवाह रोखण्यात अधिकाऱ्यांना यश आले आहे.

बालविवाह होणार आहे, याची पूर्व माहिती चाइल्ड लाइनच्या १०९८ हेल्पलाइन क्रमाकांवर मिळताच सदर माहिती बालकल्याण समिती आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाला देण्यात आली.

तसेच संबंधित पोलिस स्टेशन यांच्या साह्याने एक पथक संबंधित गावात दाखल होऊन समुपदेशन करून तसेच बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ विषयी माहिती देऊन होणारे बालविवाह थांबविण्यात यश आले. त्यांनतर संबंधित गावातील ग्रामपंचायत, शाळा आणि अंगणवाडी केंद्र येथून अल्पवयीन बालिकेचा वयाचा पुरावा प्राप्त केला, या पुराव्याच्या आधारावर बालिकांचे वय निश्चित करून बालविवाह थांबविण्यात आले.


जिल्हा परिषदेत आयोजित बैठकीत मार्गदर्शन करतांना मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश्वरी एस.

संबंधित पोलिस विभागाच्या सहकार्याने बालसंरक्षण कक्ष व धुळे चाइल्ड लाइन टीमने स्वतः उपस्थित राहून कार्यवाही पार पाडली. अल्पवयीन बालिकेचे व तिच्या पालकांचे समुपदेशन करून मुलाला, मुलीला तसेच त्याच्या पालकांना धुळे बालकल्याण समितीसमोर उपस्थित करण्यात आले. सदर चाइल्ड लाइन प्राप्त प्रकरणात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सचिन शिंदे, संस्था अध्यक्षा मीना भोसले तसेच बालकल्याण समिती अध्यक्षा व सदस्य यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

## अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर अलर्ट

२२ मे रोजी अक्षय तृतीया आहे व हा शुभ मुहूर्त समजला जातो. या दिवशी अधिकाधिक विवाह होतात. यामध्ये बालविवाहाचे प्रमाणदेखील आहे. अशा वेळी नागरिकांनी दक्ष राहावे, गावात बालविवाह होत असतील तर तत्काळ चाइल्ड लाइनच्या १०९८ या क्रमांकावर कॉल करून माहिती द्यावी. सदर माहिती ही पूर्णपणे गोपनीय असून, यामध्ये कॉल करणाऱ्या व्यक्तीचे नाव गुपित ठेवलेले असते, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश्वरी एस., जिल्हा महिला बालविकास अधिकारी सचिन शिंदे, चाइल्ड लाइन संचालक संस्था अध्यक्षा मीना भोसले यांनी केले आहे.

सहा महिन्यांत सर्वात जास्त बालविवाह हे साक्री तालुक्यात रोखण्यात आले. साक्री तालुक्यात ९ बालविवाह थांबवण्यात आले.

# धुळे येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (ITI) येथे कायदेविषयक मार्गदर्शन

जिल्हा विधि सेवा प्राधिकरण धुळे व सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे यांच्या सयुंक्त विद्यमाने औद्योगिक प्रशिक्षण केंद्र धुळे येथे कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. औद्योगिक प्रशिक्षण केंद्र येथील १५० विद्यार्थी व विद्यार्थिनी या मार्गदर्शन कार्यक्रमात सहभागी झाले. भविष्यामध्ये जेव्हा आपण एखाद्या कंपनी किंवा कामाच्या ठिकाणी असतांना आपले शोषण होऊ नये तसेच कामगाराचे कायदे, आपल्यावर चुकीची कार्यवाही झाली तर किंवा कामावर शोषण होत असेल तर आपण कुणाकडे दाद मागायची आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची भूमिका काय आहे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सदर कार्यक्रमाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मा.संदीप स्वामी सर, सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले, मनपा ICTC चे समुपदेशक सीमा बाविस्कर उपस्थित होते.






# "महा NGO फेडरेशन मार्फत उत्तर महाराष्ट्रस्तरीय उत्कृष्ट NGO पुरस्कार वितरण सोहळा संपन्न."

दिनांक १४/०१/२०२४ रोजी महा NGO फेडरेशन पुणे, सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्था धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक आणि नगर जिल्ह्यातील ३१ NGO ना उत्कृष्ट NGO पुरस्कार देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महा NGO फेडरेशनचे संस्थापक तथा गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा.शेखरभाऊ मुंदडा होते. उदघाटक धुळे महानगरपालिकेच्या उपायुक्त पल्लवी शिरसाठ, IMA अध्यक्ष डॉ.संजय शिंदे, सरकारी कर्मचारी संघटनेचे राष्ट्रीय कार्यकारणीचे अध्यक्ष डॉ.संजय पाटील, द्वारकाधीश प्रतिष्ठानचे बापुजी शेलार, रोटरी धुळे क्रॉसचे दीपक अहिरे, NGO फेडरेशन संचालक मुकुंद शिंदे, गणेश बाकले, सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मिना भोसले आणि जोशाबा सांस्कृतिक क्रिडा मंडळाचे दिलीपभाऊ माळी उपस्थित होते.

आपल्या अध्यक्ष भाषणात शेखरभाऊ मुंदडा म्हणाले की, महाराष्ट्रात लाखो NGO रजिस्टर आहेत, पण मात्र योग्य त्या मार्गदर्शनाअभावी त्यांना सामाजिक उपक्रमात शासकीय निधी आणता येत नाही किंवा त्यांना येणाऱ्या विविध अडचणी सोडवता येत नाही. म्हणून महा NGO फेडरेशनची स्थापना करून महाराष्ट्रातील जास्तीत जास्त NGO ना NGO बाबतीत मार्गदर्शन मिळावे, त्यांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यात यावे म्हणून महा NGO फेडरेशनची स्थापना केलेली आहे. गेल्या पाच वर्षात अनेक NGO ना अनुदान मिळवून देण्यासाठी NGO फेडरेशन प्रयत्न केलेले आहेत व NGO ना प्रोत्साहन मिळावे म्हणून अतुल्य सन्मान सोहळा देखील महा NGO फेडरेशन आयोजित करत असते. त्याचाच एक भाग म्हणजे आजचा उत्तर महाराष्ट्रस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा होय. आज ३१ विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना पुरस्कार देतांना आम्हाला आनंद होत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मिना भोसले यांनी केले. त्यात त्या म्हणाल्या की, ज्या प्रमाणे शेतकरी शेतात धान्य पेरतांना त्या शेतात किती उगवणार? काय उगवणार? याचा विचार करत नसतो फक्त पेरणीवर शेतकरी लक्षकेंद्रित करत असतो त्याप्रमाणे आम्ही सामजिक संस्था चालविणारे NGO प्रतिनिधी रात्रंदिवस काम करत असतो, आम्हाला काय मिळेल आम्हाला माहित नसते, कधी आमचे काम स्विकारले जाते, कधी स्विकारले जात नाही याच आशेवरती आम्हाला आज ना उद्या आमच्या शेतात यश मिळेल. तसेच सन्मानपत्र वाचन, प्रमुख पाहुण्यांचा परिचय, जोशाबा सांस्कृतिक क्रिडा मंडळाचे अध्यक्ष दिलीपभाऊ माळी यांनी केले. कार्यक्रमात खालील संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

१) स्व.दरबारसिंग राजपूत प्रतिष्ठान, भावेर

२) दिव्या गोमाता गोशाळा,धुळे

३) मातोश्री गुंताबाई आखाडे बहु. कृषी व पशु संशोधन संस्था, महिंदळे धुळे

४) उडान दिव्यांग प्रशिक्षण केंद्र

५) इंदिरा महिला मंडळ धुळे

६) ग्राम अस्तित्व फाउंडेशन

७) मानस फाउंडेशन

८) श्रीमती एम.एम. चतुरमुत्था पांझरापोळ एवं प्राणीरक्षक संस्था

९) कल्पतरू महिला विकास मंडळ धुळे

१०) ग्रामविकास प्रतिष्ठान

११) दो शाह तकिया ब्लड फाउंडेशन, नंदुरबार

१२) साने गुरुजी फाउंडेशन, अमळनेर

१३) ग्लोबन व्हिजन सोशल वेल्फेअर फाउंडेशन, नाशिक

१४) युवक मित्र परिवार, नंदुरबार

१५) गायत्री फाउंडेशन, नंदुरबार

१६) अवंता फाउंडेशन

१७) मुक्ता आदिवासी महिला बहुद्देशीय संस्था, धुळे

१८) कोळी महासंघ महाराष्ट्र राज्य नाशिक

१९) स्व.सुकलाल सखाराम माळी सार्वजनिक वाचनालय, म्हसाळे

२०) नवजीवन ग्रामोदय प्रतिष्ठान

२१) नेटवर्क ऑफ धुळे बाय पिपल लिविंग विथ एच.आय.व्ही.

२२) राजमुद्रा प्रतिष्ठान

२३) सहारा वेलफेअर सोसायटी

२४) श्रीराम फाउंडेशन

२५) संघर्ष समाज मंडळ रारामेश्वर ता.देवळा जि.नाशिक

२६) खान्देश युवा फाउंडेशन

२७) जय भद्रा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था प्रतापपूर ता. साक्री जि. धुळे

२८) आई फाउंडेशन

२९) श्री विश्वकर्मा शिक्षण प्रसारक मंडळ धुळे,ता.जि. धुळे

३०) नेटवर्क ऑफ नंदुरबार बाय पिपल लिविंग विथ एच.आय.व्ही./एड्स

३१) नेहरू युवा मंडळ म्हसाळे

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महा NGO फेडरेशनचे पदाधिकारी, सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेचे पदाधिकारी व जोशाबा सांस्कृतिक क्रिडा मंडळ सोनगीरचे पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.आखाडे यांनी केले.




महा NGO फेडरेशनचे संस्थापक तथा गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा.शेखरभाऊ मुंदडा दिप प्रज्वलन करतांना.



लोकमत

# उत्तर महाराष्ट्रस्तरीय उत्कृष्ट एनजीओ पुरस्काराचे वितरण



धुळे येथील आयएमए हॉलमध्ये रविवारी महाएनजीओ फेडरेशनतर्फे उत्तर महाराष्ट्रस्तरीय उत्कृष्ट एनजीओ पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** येथील आयएमए हॉलमध्ये रविवारी महाएनजीओ फेडरेशनतर्फे उत्तर महाराष्ट्रस्तरीय उत्कृष्ट एनजीओ पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमात धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक आणि नगर जिल्ह्यातील ३१ एनजीओंना हा पुरस्कार देण्यात आला. महा एनजीओ फेडरेशन पुणे, सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे व जोशावा सांस्कृतिक क्रीडा मंडळ सोनगीर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला.

अध्यक्षस्थानी फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा होते. उद्घाटक महानगरपालिकेच्या उपायुक्त पल्लवी शिरसाठ, आयएमए अध्यक्ष डॉ. संजय शिंदे, सरकारी कर्मचारी संघटनेचे राष्ट्रीय कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, द्वारकाधीश प्रतिष्ठानचे शेलार, रोटरी धुळे क्रॉसचे दीपक अहिरे, फेडरेशन संचालक मुकुंद शिंदे, गणेश बाकले, सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा मीना भोसले व जोशाबा सांस्कृतिक क्रीडा मंडळाचे दिलीप माळी उपस्थित होते.

स्व. दरबारसिंग राजपूत प्रतिष्ठान, भावेर, दिव्या गोमाता गोशाळा, धुळे, मातोश्री गुंताबाई आखाडे बहु. कृषी व पशू संशोधन संस्था, महिंदळे धुळे, उडान दिव्यांग प्रशिक्षण केंद्र, इंदिरा महिला मंडळ धुळे, ग्राम अस्तित्व फाउंडेशन, मानस फाउंडेशन, एम. एम. चतुरमुत्था पांझरापोळ आणि प्राणिरक्षक संस्था, कल्पतरू महिला विकास मंडळ धुळे, ग्रामविकास प्रतिष्ठान, दो शाह तकिया ब्लड फाउंडेशन, नंदुरबार, साने गुरुजी फाउंडेशन, अमळनेर, ग्लोबन व्हिजन सोशल वेल्फेअर फाउंडेशन, नाशिक, युवक मित्र परिवार, नंदुरबार, गायत्री फाउंडेशन, नंदुरबार, अवंता फाउंडेशन, मुक्ता आदिवासी महिला बहुउद्देशीय संस्था, धुळे, कोळी महासंघ महाराष्ट्र राज्य नाशिक, स्व. सुकलाल सखाराम माळी सार्वजनिक वाचनालय, म्हसाळे, नवजीवन ग्रामोदय प्रतिष्ठान, नेटवर्क ऑफ धुळे बाय पिपल लिविंग विथ एच. आय. व्ही., राजमुद्रा प्रतिष्ठान, सहारा वेलफेअर सोसायटी, श्रीराम फाउंडेशन यांचा समावेश आहे.

Jalgaon Main
Page No. 8 Jan 19, 2024
Powered by: erelego.com